सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : २३ | गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com






## दिनविशेष

१६ ऑक्टोबर

- भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन यांनी बंगालच्या फाळणीचा आदेश दिला.
- जागतिक व्यावसायिक बिलियर्ड्स, स्नूकर संघटनेतर्फे वर्षातील सर्वोत्कृष्ट बिलियर्ड्स खेळाडूसाठी दिला जाणारा फ्रेड डेव्हिस पुरस्कार भारताच्या गीत सेठीला देण्यात आला.

# ‘मविआ’चा विविध मागण्यांसाठी अमळनेरात आक्रोश मोर्चा

## माजी खासदार उन्मेष पाटील यांची महसूल व कृषी विभागावर शिव्यांची अभुतपूर्व आगपाखड!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव द्यावा, सरसकट कर्जमाफी करा, सात बारा कोरा करा, शासकीय खरेदी केंद्र सुरू करावे, पीक विमा मंजूर करावा, भावांतर योजना लागू करा, हेक्टरी ५० हजार नुकसान भरपाई द्यावी आदी मागण्यांसाठी घोषणाबाजी करीत महाविकास आघाडीतर्फे बुधवार, दि. १५ रोजी दुपारी शासनाविरूद्ध शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा काढण्यात आला. मात्र, हा मोर्चा खऱ्या अर्थाने गाजला आणि वाजला, तो माजी खासदार उन्मेष पाटील यांनी महसूल व कृषी विभागावर शिव्यांचा भडीमार करत केलेल्या आगपाखडीमुळे...!

छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहापासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पार्पण करून मोर्चाला सुरुवात झाली. स्टेशनरोड मार्गे मोर्चा प्रांताधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चाचे रुपांतर सभेत झाले. माजी खासदार उन्मेश पाटील, माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, उपाध्यक्ष सुरेश पिरन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. यावेळी किसान काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष पाटील, तालुकाध्यक्ष डॉ. डी. एम. पाटील, दिनेश पवार, शहराध्यक्ष प्रशांत निकम, किसान सेलचे तालुकाध्यक्ष मनोहर पाटील, शिवसेना (उबाठा) जिल्हा संपर्क प्रमुख कारभारी आहेर, तालुकाध्यक्ष राजेंद्र मराठे, शहराध्यक्ष चंद्रशेखर भावसार, संघटक मोहन भोई, देवेंद्र देशमुख, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत सूर्यवंशी, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, पंचायत समितीचे माजी उपसभापती धनगर दला पाटील आदी उपस्थित होते.

त्यानंतर मोर्चातील शिष्टमंडळाने प्रांताधिकारी नितीनकुमार मुंडावरे यांना निवेदन दिले. दरम्यान, सभेत जिल्हा सरचिटणीस संदीप घोरपडे, ज्येष्ठ नेते प्रा. अशोक पवार, किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे यांची भाषणे झाली.

### पंचनाम्यांच्या प्रश्नावर महसूल,कृषी विभागाच्या अब्रूचाच पंचनामा!

शेतकऱ्यांना विविध प्रकारची नुकसानभरपाई, पंचनामे, विमा व विविध समस्यांवरून माजी खासदार उन्मेष पाटील यांनी प्रांताधिकारी नितीनकुमार मुंडावरे यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने श्री. पाटील यांनी श्री. मुंडावरे यांच्यासह महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना अक्षरशः शिविगाळ करून व अत्यंत संतप्त शब्दात जणू त्यांच्या अब्रूचाच पंचनामा केला. श्री. पाटील इतके संतप्त झाले होते, की त्यांना आवरणे किंवा रोखणेही कोणाला शक्य झाले नाही. त्यांच्या तोंडून निघालेल्या शिव्या व अपशब्द ऐकून सारे अवाक् झाले होते. श्री. मुंडावरे व उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कमालीचा संयम दाखविल्याने वातावरण शिगेला पोहोचले नाही. अन्यथा विरोधी पक्षांची ताकद दाखविण्याच्या इराद्याने आलेल्या मोर्चेकरी व प्रशासनात मोठा संघर्ष होऊन काही अघटित व अप्रिय घटना घडण्याचीही शक्यता नाकारता आली नसती.




भाजप सरकारने स्वदेशी मेळावे घेतले. मात्र, ज्यावेळी शेतकऱ्यांच्या कापसाला भाव देण्याची वेळ आली. त्यावेळी त्यांनी ११ टक्के कर वगळण्यात आला. एका रात्रीतून कापसाचे भाव बाराशे रुपयांनी उतरले. मी खासदार असताना ५५ हजार शेतकऱ्यांना ७८ कोटी रुपये अमळनेर तालुक्याला मिळाले होते. आता तर अशी परिस्थिती अशी आहे, की पाच लोकांना ७८ रुपयेही मिळत नाहीत. शासनाने बलविलेल्या पीक विम्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अमळनेर तालुक्यात जुलै महिन्यात २१ दिवस पावसाचा खंड पडला. मात्र, याची नुकसान भरपाई मिळाली नाही. जिल्ह्यातील तीन तालुक्यांचा अतिवृष्टीबाधितांत समावेश झाला. मात्र, त्यात अमळनेर तालुक्याचा समावेश झाला नाही. झाला असता तर तीन हेक्टर मर्यादेपर्यंत शेतकऱ्यांच्या हातात ८ हजार रुपये जमा झाले असते.

**– उन्मेष पाटील, माजी खासदार, जळगाव.**



मी एक डॉक्टर आहे. त्यामुळे सर्वांचे आजार ओळखतो. शेतकऱ्यांच्या व्यथाही मी जाणतो. शेतकऱ्यांना एक रुपयाही विमा मिळाला नाही. तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर होत नाही. मालाला भाव मिळत नाही. मानसिकदृष्ट्या आपला शेतकरी खचलेला आहे. शेतकऱ्यांनी आपला स्वाभिमान जागृत ठेवला पाहिजे. आपण महापुरुषांचे फक्त नाव घेतो. मात्र, त्यांच्यासारखी कृती करीत नाही. कितीही मोर्चे, मेळावे काढा मात्र यांना काहीही फरक पडत नाही. जोपर्यंत सत्ताधाऱ्यांना तुम्ही जाब विचारणार नाहीत, तोपर्यंत काहीही होणार नाही. मतदार विकला गेला आहे. आता आगामी निवडणुकांमध्ये अमिषाला बळी पडू नका. अमळनेर तालुका हा बिकाऊ तालुका नव्हे, तर स्वाभिमानी तालुका आहे, हे दाखवून द्यावे.

**– डॉ. बी. एस. पाटील, माजी आमदार अमळनेर.**



शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी दिवसेंदिवस गरीब होत आहे. १९९४ मध्ये अंगणवाडीसेविकांचे वेतन ४०० रुपये होते. मात्र, त्यांनी जिल्हा, राज्यभरात आंदोलन करून त्यांचे वेतन १३ हजारांपर्यंत नेले आहे. चाळीस पट मानधन वाढले आहे. १९९४ मध्ये ४ हजार ५०० रुपये तोळे सोने होते, ते आज १ लाख २३ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहे. १९९४ मध्ये कापूस २ हजार ६०० रुपये प्रतिक्विंटल होता. मात्र, हे भाव सध्या केवळ चार हजार रुपये प्रतिक्विंटल रुपये आहे. फक्त दुप्पट वाढ आहे. पिढ्यां पिढ्या जमीन कायम उत्पन्न देत असल्याने ती अमर आहे. मात्र, कोविडच्या काळात फक्त शेती सुरू होती. शासनाने अतिवृष्टीत जरी अमळनेर तालुक्याचा समावेश केला आहे. मात्र, एकही शेतकऱ्याच्या शेताचा पंचनामा झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्याला एक रुपयाही मिळणार नाही.

**– प्रा. सुभाष पाटील, जिल्हाध्यक्ष किसान काँग्रेस, जळगाव.**

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा–जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा–तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## दीड कोटींचे अवैध मद्य जप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

परराज्यातील अवैध मद्याची महाराष्ट्रात चोरट्या मार्गाने होणारी वाहतूक रोखत, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथकाने साक्री– नंदुरबार हायवेवर मोठी कारवाई केली. या कारवाईत गोवा राज्यात विक्रीसाठी असलेले सुमारे दीड कोटी रुपयांचे विदेशी मद्य जप्त करण्यात आले आहे. पथकाने टाटा कंपनी वाहन क्र. १८१६ टी सहा चाकी ट्रक कंटेनर क्र. के. ए. ५३– ए. ए. ६४६४ अडवला यावेळी वाहनांच्या तपासणीत गोवा राज्यात विक्रीस असलेले विदेशी मद्याचे १३५० बॉक्स आढळून आले. या कारवाईत जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत १ कोटी ५९ लाख ६५ हजार इतकी आहे.

# ग्लोबल महातेजचा दणका ठरला खरा...!

## जि. प. ग्रामीण पाणीपुरवठाचे उपविभागीय अधिकारी डी. डी. पाटील जेरबंद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

येथील जि. प. च्या उपविभागीय ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील अनागोंदीबाबत दै. ग्लोबल महातेजकडे अनेकांनी धक्कादायक तक्रारी केलेल्या होत्या. हल्ली तक्रारींना न्याय मिळवून देण्याचे सर्वोत्कृष्ट व निर्भिड व्यासपीठ म्हणून सर्व जण मोठ्या आशेने ग्लोबल महातेजकडे पाहू लागले आहेत. ग्लोबल महातेजही कोणतीही मुलाहिजा न बाळगता सत्ततेवर आधारीत तक्रारी व समस्यांना वाचा फोडित आहे. ग्लोबल महातेजने सुभाष चौकातील जिल्हा परिषदेच्या उपविभागीय पाणीपुरवठा कार्यालयाबाबत बातमीरुपाने मांडलेली विदारक वस्तुस्थिती खरी ठरली आहे. अवघ्या दोनच दिवसात आमच्या बातमीतील प्रखर सत्यता उघडकीस आली आहे.



सदर कार्यालयातील उपविभागीय अधिकारी डी. डी. पाटील यांना लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांनी बुधवार, दि. १५ रोजी सायंकाळी रंगेहात पकडले आहे. यावेळी डी. डी. पाटील नशेत असल्याची जोरदार चर्चा आहे. दै. ग्लोबल महातेजने याबाबत लावलेली बातमीरुपी फटाक्यांची लड दिवाळीपुर्वीच ॲन्टी करप्शनची धाड पडल्याने धाडधाड फुटली आहे...

दरम्यान, डी. डी. पाटील यांच्यावर झालेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईची बातमी तत्काळ सर्वत्र पसरली. सुभाष चौकात त्यामुळे मोठी गर्दी जमली होती. यावेळी उपस्थितांमध्ये दोन दिवसांपूर्वीच सदर कार्यालयाच्या बेछुट कारभाराबाबत दै. ग्लोबल महातेजने प्रसिद्ध केलेल्या बातमीची चर्चा होती. आमच्या प्रतिनिधींजवळ काहींनी याबाबत बोलूनही दाखविले. उपस्थितांनी जे झाले ते फार चांगले झाले अशाच प्रतिक्रिया व्यक्त केल्या हे विशेष...!

सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते. त्यामुळे सविस्तर बातमी गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी वाचा



**दै. ग्लोबल महातेजने सोमवार दि. ०६ रोजी प्रसिध्द केलेल वृत्त**


### जि. प. बांधकाम उपविभागाचे कार्यालय असते रिकामे, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे खिसे असतात मात्र भरलेले!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : काही दुकाने, खासगी कार्यालय, गोडाऊन आदी ठिकाणी मालक परगावी असला तर तेथे जसे सामसूम व रामभरोसे वातावरण असते. तसेच काहीसा प्रकार येथील सुभाष चौकातील जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यालयात दिसून येतो. तेथील खूर्च्या कदाचित आरामदायी नसतील किंवा त्या खूर्चीवर बसल्यानंतर खालच्या भागावर चिमटी घेतली जाते की काय? अशी शंका अनेकांना येते. त्याचे कारण म्हणजे बऱ्याचदा त्या खूर्च्या रिकाम्याच दिसतात. त्या खूर्चीवर बसणारे अधिकारी व कर्मचारी यांचे सदेह प्रकट दर्शन क्वचितच होते, अशी अनेकांची दीर्घकाळापासून चर्चा आहे. त्यांच्याबाबत लोकप्रतिनिधींपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत तक्रारीही झाल्या आहेत. मात्र, त्याचा काहीएक परिणाम न झाल्याने सदर कार्यालयातील मंडळी बिनधास्त आहे. जणू काही आम्हाला पटेल तसे आम्ही वागू, आमचे जमले तर आम्ही येऊ, नाही तर येणारही नाही अशीच त्यांची मनोप्रवृत्ती झाल्याची तक्रार आहे. या कार्यालयाला कोणी वाली आहे किंवा नाही? असा प्रश्न नागरिकांना भेडसावतो आहे. सदर कार्यालयावर कोणाचाच वचक नसल्याने हे संपूर्ण कार्यालयच जणू वाऱ्यावर आहे.

जिल्हा परिषद बांधकाम उपविभागीय कार्यालय आणि ग्रामीण पाणीपुरवठा उपअभियंता कार्यालयात सावळा गोंधळ असल्याची नेहमीच चर्चा असते. सरकारी कार्यालय असूनही शिस्त आणि जबाबदारीचा तेथे चांगलाच अभाव आहे. नेहमीच ओसाड दिसणाऱ्या या दोन्ही कार्यालयात अधिकारी असोत की शिपाई कोणीही आपल्या ठिकाणी सहसा आढळत नाही. विशेष म्हणजे या कार्यालयाचा दरवाजा नेहमी उघडा





असतो. मात्र, त्यातील खुर्च्या रिकाम्या असतात. काही कर्मचारी कार्यालयीन वेळ सुरू होण्यापूर्वीच सह्या करून रफूचक्कर होतात, असेही सांगितले जाते. त्यांचा मोबाईल नंबर मिळवून नागरिकांनी त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास ऑफिसच्या कामासाठी बाहेर आलो आहे. वेळ लागेल. नंतर या. उद्या या. किंवा चहा प्यायला आलो आहे. थोड्या वेळाने येतो, अशी उत्तरे मिळत असल्याचे नागरिक सांगतात. काही जण साईट व्हिजिटच्या बहाण्याने कायम बाहेर असतात. मात्र, एमबी रेकॉर्डच्या दिवशीच ते वेळेत हजर असतात. याचे कारण म्हणजे त्यांना “लक्ष्मी दर्शन” घडते, असा नागरिकांचा आरोप आहे. काम दिलेल्या ठेकेदाराचे बिल काढताना “ त्यांचे झाले का, यांचे दिले का? मी किती ॲडजस्ट केले.” अशा भाषेत ते खुलेआम चर्चा करतात. हालचाल रजिस्टर मागितले असता “ साहेबांच्या कपाटात आहे ” असे सांगून जबाबदारी झटकतात. वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोनवर संपर्क साधला तर ते उचलतही नाही. काहींनी उचललाच तर, “ मी सध्या मिटिंगमध्ये आहे, नंतर बोलतो,” अशी उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याच्या तक्रारी आहेत. नागरिकांची कामे प्रलंबित राहतात, तक्रारी ऐकून घेणारा कोणी नाही, अशी ओरड नागरिकांमधून होत आहे. या कार्यालयातील सतत दांडीयात्रा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची लोकप्रतिनिधींनीच हजेरी घ्यावी. जिल्हा परिषदेतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी या कार्यालयाच्या एकूणच कामकाजाची व कारभाराची चौकशी करून योग्य ती ॲक्शन घ्यावी, अशी मागणी होत आहे.


## आपली दिवाळी, स्वदेशी दिवाळी

### दिवाळी आपल्यासाठीही अन् गरिबांसाठीही





स्वदेशीचा अंगीकार करीत
स्थानिक खरेदीला महत्त्व देऊया..
गरीब, कष्टकरी, मध्यमवर्गीय, छोटे उद्योजक,
छोटे व्यावसायिक, स्थानिक कारागीर,
महिला बचत गट यांच्या उत्पादनांना खरेदी
करूया.. त्यांच्या घरातही प्रकाशपर्व साजरे
करण्यासाठी आपण हातभार लावूया..
प्रकाशपर्व, आनंदपर्व आणि समृध्दीपर्व
म्हणजेच दिवाळी.. चला, जागे व्हा..!
परदेशी वस्तूंना झुगारूया.. ऑनलाईन
तथा विदेशी उत्पादनांच्या खरेदीऐवजी
स्वदेशीच उत्पादने खरेदी करूया..!

**स्वदेशी उत्पादने खरेदी करून देशाला आणि गरजूंना बळ देऊया...! हीच खरी तुमची, आमची, आपल्या सर्वांचीच दिवाळी...!!**



# एटीएम पिन ‘ हा ’ असल्यास बँक खाते होऊ शकते रिकामे

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सध्याच्या डिजिटल युगात एटीएम आणि डेबिट कार्डचा वापर सर्वश्रुत झाला आहे. दैनंदिन गरजांनुसार ती खरेदी असो, बिल भरणे असो वा रोख रक्कम काढणे असो. बहुतेक जण एटीएम कार्डवरच अवलंबून असतात. परंतु तुमचा एटीएम पिन जर साधा असेल किंवा जन्मतारीख, मोबाइल नंबर यांसारखी सहज उपलब्ध माहिती असेल, तर सायबर चोरटे तुमचे बँक खाते रिकामे करू शकतात. सायबर सुरक्षेच्या दृष्टीने तुमचा पिन सुरक्षित ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. चला, जाणून घेऊया कोणते पिन धोकादायक आहेत आणि सुरक्षित पिन कसा निवडावा.

**कोणते पिन धोकादायक आहेत?**

सायबर सुरक्षातज्ज्ञांच्या मते- खालील पिन सर्वांत असुरक्षित आणि सहज हॅक होऊ शकणारे आहेत.

**– साधे आणि पुनरावृत्ती असलेले पिन :** उदा.- १२३४, ००००, ११११, २२२२, ३३३३, १२१२, ११२२.

– तज्ज्ञांच्या मते-१२३४ हा जगात सर्वाधिक वापरला जाणारा आणि सर्वांत सहज हॅक होणारा पिन आहे. वैयक्तिक माहितीवर आधारित पिन

– जन्मतारीख (उदा.- १५०८१९९०), मोबाइल नंबरचे शेवटचे चार अंक, किंवा गाडीचा नंबर.

– ही माहिती सोशल मीडिया किंवा इतर पब्लिक डोमेनमधून सहज मिळू शकते. ज्यामुळे सायबर चोरट्यांना तुमचा पिन अंदाजणे सोपे जाते. सायबर चोरटे खाते हॅक करण्यासाठी प्रथम साधे पिन (१२३४, ११११) किंवा वैयक्तिक माहितीवर आधारित पिन ट्राय करतात. त्यामुळे अशा पिनमुळे तुमचे बँक खाते धोक्यात येऊ शकते.

**सुरक्षित पिन निवडण्यासाठी टिप्स**

तुमचे बँक खाते सुरक्षित ठेवण्यासाठी खालील सायबर सुरक्षा सूचनांचे पालन करावे.

**१) मिश्र पॅटर्नचा पिन निवडा :**

– संख्यांचा (०-९) आणि मिश्र क्रमाचा (उदा.- ७३९१, ४८२६) पिन निवडा. सलग (१२३४) किंवा पुनरावृत्ती (११११) असलेले पिन टाळा.

**२) वैयक्तिक माहिती टाळा :**

– जन्मतारीख, लग्नाची तारीख, मोबाईल नंबर किंवा गाडीचा नंबर यांसारखी माहिती पिन म्हणून वापरू नका.

**३) पिन नियमित बदला :**

– प्रत्येक ६ महिन्यांनी किंवा संशयास्पद व्यवहार दिसल्यास तातडीने पिन बदला.

**४) पिन गोपनीय ठेवा :**

– तुमचा पिन कोणाशीही शेअर करू नका. ते मित्र, नातेवाईक किंवा बँक कर्मचारी जरी असले, तरी शेअर करू नका.

– एटीएम किंवा ऑनलाइन व्यवहार करताना पिन टाकताना आजूबाजूला कोणी नसल्याची खात्री करा.

**५) सुरक्षित ठिकाणी नोंद ठेवा :**

– पिन लक्षात ठेवण्यासाठी तो कागदावर किंवा मोबाईलमध्ये नोंदवू नका. जर नोंदविला असेल, तर तो सुरक्षित ठिकाणी ठेवा.

### एटीएम वापरताना सावधगिरी

**– एटीएम बूथ तपासा :** एटीएम मशीनवर स्किमिंग डिव्हाईस किंवा लपविलेले कॅमेरे नाहीत याची खात्री करा.

**– सार्वजनिक वाय-फाय टाळा :** ऑनलाईन बँकिंग करताना सार्वजनिक वाय-फाय वापरू नका.

**– सतर्क राहा :** बँकेकडून येणारे संदेश, ई-मेल किंवा फोन कॉल्स तपासा. संशयास्पद काही दिसल्यास त्वरित बँकेशी संपर्क साधा. एटीएम पिन हा तुमच्या बँक खात्याच्या सुरक्षेचा महत्त्वाचा भाग आहे. साधे किंवा वैयक्तिक माहितीवर आधारित पिन वापरणे म्हणजे सायबर चोरट्यांना खाते हॅक करण्याची संधी देणे. मिश्र पॅटर्नचा पिन निवडा, तो नियमित बदला आणि गोपनीय ठेवा. सायबर सुरक्षेच्या या सोप्या पायऱ्यांचे पालन करून तुम्ही तुमचे बँक खाते सुरक्षित ठेवू शकता. सावध राहा, सुरक्षित राहा.



## वय नव्हे; जिद्द महत्त्वाची
## संगमनेरच्या ७० वर्षीय शेतकऱ्याने फुलवली सेंद्रिय केळीची बाग

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

संगमनेर तालुक्यातील अंबिखालसा येथील ७० वर्षीय शेतकरी विलास घाटकर यांनी वयाच्या अडथळ्यांना न जुमानता एक एकरावर सेंद्रिय केळीची बाग फुलविली आहे. त्यांच्या जिद्द आणि मेहनतीने तरुण शेतकऱ्यांसमोर एक प्रेरणादायी उदाहरण उभे राहिले आहे.

**जी-९ केळीची लागवड आणि सेंद्रिय शेतीचा निर्णय**

विलास घाटकर यांच्याकडे वडिलोपार्जित दोन एकर शेती आहे. त्यांच्या दोन मुलांपैकी एक किराणा दुकान चालवतो. दुसरा परदेशात नोकरी करतो. त्यामुळे शेतीकडे लक्ष देणारे कोणी नव्हते. अशा परिस्थितीत वयाच्या ७० व्या वर्षी घाटकर यांनी स्वत: शेतीची कास धरली. ऑगस्ट २०२४ मध्ये त्यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत कमी खर्चात जास्त उत्पादन देणाऱ्या सेंद्रिय शेतीचा मार्ग निवडला. त्यांनी एका एकरावर जी-९ जातीच्या ११०० केळीच्या रोपांची लागवड केली. आता १२ महिन्यांनंतर या बागेत मोठमोठे केळीचे घड लटकलेले दिसत आहेत.

**कमी खर्च, जास्त फायदा**

केळीच्या बागेसाठी घाटकर यांना एकूण एक लाख रुपये खर्च आला. प्रत्येक रोप २० रुपये दराने घेतले. रासायनिक खतांऐवजी त्यांनी सात ट्रॉली शेणखत आणि नैसर्गिक उपायांचा वापर केला. ड्रिप इरिगेशनद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करत त्यांनी पिकाची काळजी घेतली. विशेष म्हणजे केळीची बाग पूर्ण विकसित होईपर्यंत त्यांनी मेथी आणि सोयाबीनसारखी आंतरपिके घेतली. या आंतरपिकांच्या उत्पन्नातून एक लाख रुपये खर्च भरून निघाला. त्यामुळे आता केळीच्या बागेतून मिळणारे उत्पन्न निव्वळ नफा ठरणार आहे. ‘ श्रम आणि चिकाटीने शेती केल्यास कोणतेही पीक चांगले येते. केळीचे पीक तर विशेष फायदेशीर आहे ’, असे घाटकर सांगतात.

**तरुणांसाठी प्रेरणा**

वयाच्या साठी-सत्तरीत अनेकजण शारीरिक कामे टाळतात. पण विलास घाटकर यांनी ७० व्या वर्षीही शेतीत अथक परिश्रम घेतले. त्यांच्या एक एकराच्या बागेत ११०० केळीची रोपे हिरवीगार शोभा देत असून, मोठे केळीचे घड लटकताना दिसत आहेत. सेंद्रिय पद्धतीने तयार झालेले हे पीक त्यांच्या जिद्द आणि मेहनतीचे फलित आहे. ‘ वय कितीही असले, तरी मेहनत आणि जिद्द असेल तर शेतीत यश मिळवता येते ’, हे घाटकर यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.



**प्रेरणादायी संदेश**

विलास घाटकर यांचा हा प्रवास तरुण शेतकऱ्यांसाठी प्रेरणा आहे. त्यांच्या सेंद्रिय केळीच्या बागेने केवळ आर्थिक नफाच नाही, तर वयाला मर्यादा नसतात, हे सिद्ध केले आहे. त्यांची ही जिद्द आणि मेहनत प्रत्येकाला नवे ध्येय साध्य करण्यासाठी प्रोत्साहित करते.

## जागतिक अन्न दिन : अन्नाची कदर, भविष्यासाठी जबाबदारी!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



संपूर्ण जगभरात दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी ‘ जागतिक अन्न दिन’ साजरा केला जातो. अन्न व कृषी संघटना (FAO - Food and Agriculture Organiza-tion) या संयुक्त राष्ट्रांच्या शाखेची स्थापना १६ ऑक्टोबर १९४५ रोजी झाली होती. त्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. अन्न, पोषण, शेती आणि उपासमार यासंबंधी जनजागृती वाढविणे, ही या दिनामागील प्रमुख भूमिका आहे.

**अन्नाची गरज आणि विडंबना**

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मानवी जीवन सुखकर केले आहे. मात्र तरीही अद्याप जगातील कोट्यवधी लोक दररोज भुकेने झोपतात. दुसरीकडे बरेचसे अन्न वाया जाते, खराब होते किंवा साठवणुकीअभावी फेकून दिले जाते. ही एक भीषण विडंबना आहे एका बाजूला अन्न टंचाई, दुसऱ्या बाजूला अन्नाचा अपव्यय.

**२०२५ वर्षाचे मुख्य सूत्र**

प्रत्येक वर्षी जागतिक अन्न दिनाची एक विशिष्ट थीम असते. २०२५ या वर्षासाठी FAO कडून घोषित केलेली थीम आहे. ‘ Water is life, water is food. Leave no one behind ’. या संदेशातून स्पष्ट होते, की अन्नसुरक्षेसाठी पाण्याचे संरक्षण आणि न्याय्य वितरण देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**भारताची जबाबदारी आणि संधी**

भारत हा कृषिप्रधान देश असून जगात अन्नधान्य उत्पादनात अग्रगण्य आहे. तरीही दारिद्र्य, साखळी व्यवस्थेतील त्रुटी आणि अन्नाचा अपव्यय यामुळे उपासमारीचे प्रमाण अजूनही चिंताजनक आहे. अन्नसुरक्षेसाठी ‘ अन्न सुरक्षा योजना ’, ‘ मिड-डे मील ’, ‘ पोषण अभियान ’ अशा योजनांमधून सरकार प्रयत्नशील आहे. परंतु केवळ सरकारी उपाय पुरेसे नाहीत. प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, की अन्नाचा अपव्यय टाळावा, पोषणमूल्यांची जाणीव ठेवावी आणि गरजूंना मदत करावी.

**आपण काय करू शकतो?**

जेवणानंतर अन्न उरले तर ते वाया घालवू नये. गरजूंपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करावा. ‘ झीरो वेस्ट किचन ’ आणि घरगुती शेतीस प्रोत्साहन द्यावे. लहान मुलांना अन्नाची किंमत आणि पोषणाचे महत्त्व शिकवावे. अन्नवाटप संस्था, अन्न बँक यांच्याशी संलग्न व्हावे. जगातील प्रत्येक व्यक्तीला पोटभर अन्न मिळावे, ही केवळ कल्पना नव्हे तर एक सामाजिक बांधिलकी आहे. अन्न ही केवळ भूक भागवणारी गोष्ट नाही, तर ती जीवनाची गरज, संस्कृती आणि पर्यावरणाशी जोडलेली एक साखळी आहे. त्यामुळे ‘ जागतिक अन्न दिन ’ साजरा करताना आपण सर्वांनी ‘ अन्न ही संसाधन आहे, ती संधीसारखी जपा ’ या तत्त्वाने जगण्याचा संकल्प करायला हवा.

## मुलांना फार लाडावू नका : ना. अजितदादा पवार

मुलांना फार लाडावून ठेवू नका. ऑनलाइन गेम, पब्जीमुळे एका महिलेचं बँक अकाउंट रिकामे झाले. अशा घटना टाळा. हल्ली एकटाच नागोजी असतो, तोच डोक्यावर बसतो. मध्ये काय ड्रीम ११ आले आहे, ते खेळत बसू नका, असे ऑनलाइन गेमिंगच्या वाढत्या व्यसनावर राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी उपस्थित सभासदांचे कान टोचले. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी (पीडीसीसी) बँकेच्या २६ सप्टेंबर रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बँकेच्या संचालक आणि सभासदांना अनेक सूचनांसह काही विनोदी शैलीतून थेट कानउघडणी केली. ते पुढे म्हणाले की, अल्पबचत भवनात सभेसाठी जागा अपुरी पडत असल्याने पुढील सभा गणेश कला क्रीडा भवनात भरवावी. सभासदांना खुर्ची ही मिळालीच पाहिजे, ही माझी ठाम अपेक्षा आहे. सगळ्याच गोष्टी नियमावर बोट ठेवून करू नका. शेवटी माणसे जगली पाहिजेत, बळीराजा जगला पाहिजे. उद्या-परवा पुन्हा अतिवृष्टीचा अंदाज हवामान खात्याने दिला आहे, त्यामुळे सगळ्यांनी काळजी घ्यावी. मी बँकेचा संचालक होतो, पण उगीच जागा अडवू नये म्हणून मी राजीनामा दिला. मी जेव्हा बँकेत आलो, तेव्हा रमेश आप्पा कारभार पाहत होते. त्यांना काय माहिती, बाबा आपल्याच डोक्यावर येऊन बसणार! पण आलोच. बघता बघता रमेश आप्पासोबतच माझ्या डोक्याचीही केस उडाली, असे म्हणत त्यांनी हशा पिकवला. ३ लाखांच्या पुढे कर्ज दिल्यास २४०० लोकांसाठी बँकेला ९ कोटी रुपये मोजावे लागतात. हे परवडणारे नाही. त्यामुळे पाहिजे तर खातेफोड करा, पण बँकेवर व्याज सवलतीचा बोजा टाकू नका. २ लाख ८८ हजार शेतकऱ्यांना आम्ही ३ लाखांच्या आतील कर्जासाठी आधीच ९ कोटींची व्याज सवलत दिली आहे. आजमितीला बँकेत १५ हजार कोटींच्या वर मुदत ठेवी आहेत. बँक नफ्यात आहे. एआय तंत्रज्ञानासाठी ३ कोटींची तरतूद केली आहे. बँकेत भरती करताना गुणवत्ता पाळलीच पाहिजे. मात्र, जिल्ह्यातील मुलांना संधी द्यावी, पण ते करतानाही गुणवत्ता बघा, असे सांगून त्यांनी भरती प्रक्रियेवरून टोला लगावला. शिपाई लोकांनो, मॅनर्स पाळा. नाहीतर तुम्ही म्हणाल की, आपल्याला काय दादाने काम लावलंय, आपले कोण काय करुन घेइल? असे चालणार नाही. ड्रायव्हर लोकांनी व्यवस्थित गाड्या चालवाव्यात, अशा सूचना त्यांनी कर्मचाऱ्यांना केल्या. मी जरी बँकेच्या बोर्डावर नसलो तरी माझे बारीक लक्ष असेल. पुढेही अशीच साथ द्या, असे आवाहनही ना. दादा यांनी केले.



## नौकरी चपरासी की; २५ लाख आवेदन
### ९०% उम्मीदवारों के पास बीटेक से पीएचडी तक की डिग्री!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जयपुर के गांधीनगर परीक्षा केंद्र के बाहर लंबी-लंबी कतारें देखी गईं। ये कोई राशन की लाइन नहीं, बल्कि देश के पढ़े-लिखे नौजवानों की भीड़ है, जो चपरासी की नौकरी पाने के लिए खड़े हैं। ये नौकरी ऑफिस में चाय-पानी पिलाने और फाइलें ढोने की है, लेकिन इसके लिए ग्रेजुएट्स, पोस्टग्रेजुएट्स और पीएचडी धारक तक लाइन में हैं।

**पढ़ाई चपरासी बनने के लिए नहीं थी**

यहां बात नौकरी को छोटा बताने की नहीं, बल्कि योग्यता और परिस्थितियों की है। नरेंद्र बिजानिया, जो मैथमेटिक्स में एमएससी और बीएड हैं, पिछले ५ साल से पेपर लीक के खिलाफ प्रदर्शन करते-करते थक चुके हैं। अच्छी सरकारी नौकरी की उम्मीद में उम्र ३० के करीब पहुंची तो मजबूरी में सोचना पड़ा, ‘ चलो, चपरासी ही सही!’

**गांव वाले क्या सोचेंगे?**

आजतक के पत्रकार शरत कुमार की रिपोर्ट के अनुसार, ज्यादातर एमएससी और बीटेक डिग्री वाले उम्मीदवार कैमरे से मुंह छिपाते दिखे। गांव में रिश्तेदारों को लगता है कि इतना पढ़ा-लिखा व्यक्ति बड़ी नौकरी में होगा, लेकिन हकीकत में ये लोग चपरासी की नौकरी के लिए कतार में हैं। एक उम्मीदवार ने कहा, ‘ जिस स्कूल में टीचर बनने का सपना देखा था, वहां घंटी बजाने और पानी पिलाने को तैयार हूं। ’

**८ साल बाद भर्ती, लेकिन हाल वही**

रिपोर्ट के मुताबिक, राजस्थान में ८ साल बाद फोर्थ ग्रेड (चपरासी) की भर्ती निकली है। ५३,७४९ पदों के लिए २४ लाख ७५ हजार आवेदन आए। इनमें सिर्फ १०% उम्मीदवार १० वीं पास हैं, बाकी ९०% के पास बीटेक, एमएससी, पीएचडी जैसी डिग्रियां हैं। परीक्षा के लिए ३८ जिलों में १,२८६ केंद्र बनाए गए, जहां हर शिफ्ट में ४ लाख से ज्यादा उम्मीदवार पसीना बहा रहे हैं।

**पेपर लीक और धांधली का साया**

पेपर लीक का पुराना रोग इस भर्ती को भी सता रहा है। पूर्व मुख्यमंत्रियों अशोक गहलोत और वसुंधरा राजे के कार्यकाल में ३० से ज्यादा बड़ी भर्तियों में पेपर लीक हुए। नतीजा, मेहनती उम्मीदवारों का सिलेक्शन रुका और डमी उम्मीदवारों की चांदी हुई। इस बार भी पहले दिन १,७०० उम्मीदवारों के फोटो डुप्लीकेट पाए गए, जिन्हें बाहर किया गया। नकल रोकने के लिए उम्मीदवारों से नंगे पांव परीक्षा देने को कहा जा रहा है, और नाक-कान की जूलरी तक उतरवाई जा रही है।



## तुमची गाडी २० वर्षे जुनी आहे?
### केंद्र सरकारचा नवीन निर्णय जाहीर; पहा अन्यथा...

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

केंद्र सरकारने मोटार वाहन कायद्यात एक महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यानुसार २० वर्षांपेक्षा जुन्या वाहनांनाही आता रस्त्यावर चालविण्याची परवानगी मिळाली आहे. हा निर्णय जुन्या गाड्यांची देखभाल करणाऱ्या वाहनधारकांसाठी दिलासादायक असला, तरी फिटनेस प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी दुप्पट शुल्क भरावे लागेल. ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक भार पडेल.

नव्या नियमांमुळे वाहनधारकांवर आर्थिक भार सध्याच्या नियमांनुसार काही राज्यांमध्ये १५ वर्षे जुनी वाहने स्क्रॅप करणे अनिवार्य आहे, तर इतर राज्यांमध्ये ग्रीन टॅक्स भरून नोंदणी वाढवता येते.

मात्र, केंद्र सरकारच्या नव्या नियमानुसार आता २० वर्षांपेक्षा जुनी वाहनेही चालवता येतील. पण त्यासाठी नोंदणी आणि फिटनेस प्रमाणपत्र नूतनीकरण करताना दुप्पट शुल्क भरावे लागेल. नूतनीकरण न केल्यास, दंड म्हणून दरमहा दुचाकी वाहनांसाठी ३०० रुपये आणि चारचाकी वाहनांसाठी ५०० रुपये भरावे लागतील.

**विविध वाहनांसाठी नवे शुल्क**

नव्या नियमांनुसार विविध प्रकारच्या वाहनांसाठी नूतनीकरण शुल्क खालीलप्रमाणे आहे.

**दुचाकी :** २०० रुपये
**तीनचाकी :** ५०० रुपये
**चारचाकी :** १०,००० रुपये
**अपंग व्यक्तीसाठी बनविलेले वाहन :** १०० रुपये
**इम्पोर्टेड दुचाकी/तीनचाकी :** २०,००० रुपये
**इम्पोर्टेड चारचाकी :** ८०,००० रुपये
**इतर वाहने :** १२,००० रुपये

केंद्र सरकारचा हा निर्णय जुन्या गाड्या वापरणाऱ्यांसाठी एक पर्याय उपलब्ध करून देतो. मात्र वाढीव शुल्कामुळे तो आर्थिकदृष्ट्या मोठा निर्णय ठरतो.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# सोन्याचे जगाला वेड, पण ' या ' देशांना चांदीची भुरळ;

## सर्वाधिक चांदी कोणाकडे, भारत कितवा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोन्याच्या किमतीत सातत्याने होणारी वाढ आणि त्याची वाढती मागणी यामुळे अनेक देशांच्या रिझर्व्ह बँका सोन्याचा साठा वाढवत आहेत. मात्र कधी विचार केला आहे का, की जगातील सर्वांत मोठे चांदीचे साठे कोणत्या देशांकडे आहेत? भारत चांदीच्या वापरात आघाडीवर असला, तरी साठ्यांबाबत तो पहिल्या पाच देशांमध्ये नाही.

**सोन्या-चांदीच्या किमतीत उसळी**

सध्या सोन्याचा भाव प्रथमच एक लाखाच्या पुढे गेला आहे, तर चांदीनेही १.५० लाख रुपये प्रतिकिलोचा टप्पा ओलांडला आहे. यामुळे सणासुदीच्या काळात खरेदी करणाऱ्या सर्वसामान्यांपासून नेत्यांपर्यंत सर्वांची चिंता वाढली आहे. चांदी ही केवळ दागिन्यांसाठीच नव्हे, तर सौरऊर्जा उपकरणे, विजेची उपकरणे आणि कारखान्यांमध्ये वापरली जाणारी मौल्यवान धातू आहे. तिची जागतिक मागणी सातत्याने वाढत आहे.

**चांदीची जागतिक मागणी**

चांदी ही केवळ सौंदर्यासाठीच नव्हे, तर उद्योग आणि तंत्रज्ञानातही महत्त्वाची भूमिका बजावते. काही देशांकडे इतके मोठे चांदीचे साठे आहेत, की त्यांचा जागतिक बाजारावर प्रभाव पडतो. पेरू, रशिया, चीन, पोलंड आणि मेक्सिको हे देश चांदीच्या साठ्यांमध्ये आणि उत्पादनात आघाडीवर आहेत. प्राचीन काळापासून चांदीला संपत्ती आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. आजही ती विविध उद्योगांमध्ये महत्त्वाची आहे.



**भारतातील चांदीची मागणी**

जरी भारत सर्वाधिक चांदीच्या साठ्यांच्या यादीत पहिल्या पाच देशांमध्ये नसला, तरी दागिने, नाणी आणि औद्योगिक वापरासाठी येथे चांदीची मागणी प्रचंड आहे. भारतात चांदीला सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व आहे. ती अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावते. (सदर माहिती सामान्य माहितीवर आधारित आहे. चांदीच्या साठ्यांची अचूक आकडेवारी बदलू शकते.)

### सर्वाधिक चांदीचे साठे असलेले देश

- **पेरू :** पेरूकडे जगातील सर्वांत मोठा अंदाजे १,४०,००० टन चांदीचा साठा आहे. पेरूचा हुआरी प्रदेश हा चांदीच्या खाणींसाठी प्रसिद्ध आहे. येथील अँटामिना खाण ही जगातील सर्वांत मोठ्या आणि उत्पादक खाणींपैकी एक आहे. या साठ्यांमुळे पेरूला जागतिक चांदी बाजारात ' सिल्व्हर किंग ' म्हणून ओळखले जाते.
- **रशिया :** रशिया दुसऱ्या क्रमांकावर असून, त्यांच्याकडे सुमारे ९२,००० टन चांदीचा साठा आहे. सायबेरिया आणि उरल प्रदेशातील खाणी जागतिक बाजारपेठेत महत्त्वपूर्ण योगदान देतात. ज्यामुळे रशियाची अर्थव्यवस्था बळकट होते.
- **चीन :** चीनकडे अंदाजे ७०,००० टन चांदीचा साठा आहे. हेनान प्रांतातील यिंग खाण ही देशातील सर्वांत मोठी चांदीची खाण आहे. गेल्या काही वर्षांत चीनने खनिज उत्खननात, **विशेषतः** चांदीच्या उत्पादनात लक्षणीय प्रगती केली आहे.
- **पोलंड :** पोलंडकडे सुमारे ६१,००० टन चांदीचा साठा आहे. सरकारी मालकीची कंपनी KGHM तांबे आणि चांदीच्या उत्पादनात आघाडीवर आहे. २०२४ मध्ये पोलंडमधील बहुतांश चांदी गोगो कॉपर स्मेल्टरमध्ये शुद्ध केली गेली.
- **मेक्सिको :** मेक्सिकोकडे अंदाजे ३७,००० टन चांदीचा साठा आहे. झकाटेकासमधील न्यूमोंटच्या पेनास्क्विटो खाण ही मेक्सिकोमधील दुसऱ्या क्रमांकाची आणि जगातील पाचव्या क्रमांकाची खाण आहे. ही खाण मेक्सिकोला जागतिक चांदी बाजारात महत्त्वाचे स्थान देते.

## साडेचार लाखांचा ट्रॅक्टर फक्त सव्वादोन लाखांत!

## महिलांसाठी सरकारी मेगा ऑफर

साडेचार लाखांच्या ट्रॅक्टरसाठी महिला शेतकऱ्यांना ५०% सबसिडी मिळणार! पण अर्ज कसा करायचा आणि किती बचत होईल? जाणून घ्या या योजनेचे संपूर्ण तपशील.

केंद्र सरकारच्या Sub-Mission on Agricultural Mechanization (SMAM) योजनेमुळे महिला शेतकरी आता साडेचार लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर केवळ सव्वादोन लाख रुपयांत घेऊ शकतात. ही योजना शेतकऱ्यांना आधुनिक यंत्रसामग्री वापरण्यास प्रोत्साहन देत असून महिलांसाठी खास आर्थिक मदत उपलब्ध करून देते.

**काय आहे SMAM योजना**

कृषी यांत्रिकीकरण उप-मिशन म्हणजेच SMAM योजना २०१४-१५ पासून सुरू असून शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, पॉवर टिलर, सीड ड्रिल यांसारखी साधने सवलतीत मिळवून देते. २०२५ साठी केंद्राने या योजनेसाठी एक हजार कोटींपेक्षा जास्त निधी राखून ठेवला आहे. यामध्ये ९०% केंद्राचा आणि १०% राज्याचा वाटा आहे. या योजनेतून शेतकरी १० हजार ते २० लाख रुपयांपर्यंतची यंत्रसामग्री सबसिडीवर घेऊ शकतात.

**महिलांसाठी विशेष सबसिडी**

महिला शेतकऱ्यांना ट्रॅक्टर खरेदीवर ५०% सबसिडी मिळते. साधारण शेतकऱ्यांना ४०% (जास्तीत जास्त दोन लाख रुपये) तर महिला, SC/ST आणि छोट्या शेतकऱ्यांना ५०% (जास्तीत जास्त सव्वादोन लाख रुपये) मदत दिली जाते. महिलांचे अर्ज प्राधान्याने मंजूर केले जातात आणि एक महिला शेतकरी तीन वर्षांत एकदाच ट्रॅक्टरसाठी सबसिडी घेऊ शकते.

**साडेचार लाखांच्या ट्रॅक्टरवर किती बचत?**

३५-४५ अश्वशक्ती क्षमतेच्या साडेचार लाख रुपयांच्या ट्रॅक्टरवर महिलांना ५०% म्हणजेच सव्वादोन लाख रुपये सबसिडी मिळते. त्यामुळे महिला शेतकऱ्याला उरलेले सव्वादोन लाख रुपयेच द्यावे लागतात. सामान्य शेतकऱ्यांना ४०% सबसिडीनुसार एक लाख ८० हजार रुपये मिळतात, म्हणजे त्यांना दोन लाख ७० हजार रुपये भरावे लागतात. यामुळे महिलांना साधारण ४५ हजार रुपयांचा जास्त फायदा होतो.

**अर्जाची प्रक्रिया :**

पोर्टल agrimachinery.nic.in किंवा myscheme.gov.in वर जा. नोंदणी आधार आणि मोबाईल क्रमांक वापरून रजिस्ट्रेशन करा. फॉर्म भरा ट्रॅक्टर निवडा,आधार, बँक पासबुक, जमीन नोंद यासारखी कागदपत्रे अपलोड करा. तपासणी राज्य कृषी विभाग अर्जाची पडताळणी करतो. सबसिडी हस्तांतरण डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर द्वारे थेट बँक खात्यात रक्कम जमा होते. २०२५-२६ साठी अर्ज वर्षभर खुले असले तरी प्रत्येक राज्याची वेगळी अंतिम मुदत असू शकते.

**महिलांसाठी फायदे**

या योजनेमुळे महिलांना ट्रॅक्टर खरेदीत मोठी सवलत मिळते. ट्रॅक्टर वापरल्यामुळे जुताई आणि बियाणे पेरणीची प्रक्रिया २०-३०% जलद होते आणि उत्पादनात १५-२५ % वाढ होते. महिलांसाठी मोफत ट्रॅक्टर ड्रायव्हिंग प्रशिक्षणही उपलब्ध आहे, ज्यामुळे त्या शेतीत स्वावलंबी होऊ शकतात. SMAM योजनेद्वारे महिला शेतकरी ४.५ लाख रुपयांचा ट्रॅक्टर फक्त २.२५ लाख रुपयांत घेऊ शकतात. ५०% सबसिडीमुळे महिलांना शेती आधुनिक पद्धतीने करण्याची आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी मिळते.

**सूचनाः** ही माहिती सर्वसाधारण स्वरूपाची आहे. अधिकृत तपशील आणि अर्जासाठी agrimachinery.nic.in ला भेट द्या

## दिवाळीच्या पदार्थांना ' फराळ 'च का म्हणतात?

## जाणून घ्या या शब्दाचा उगम आणि महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळी म्हटले की फराळ आठवतो. लाडू, चकली, शंकरपाळे, करंजी, चिवडा यांसारख्या चविष्ट पदार्थांचा हा खजिना दिवाळीच्या उत्सवाला खास बनवितो. या पदार्थांना ' फराळ ' का म्हणतात? हा शब्द कुठून आला आणि त्यामागील संकल्पना काय आहे, चला जाणून घेऊया.

**संस्कृतमधील उगम**

' फराळ ' हा शब्द संस्कृतमधील ' फलाहार ' या शब्दावरून आला असावा, असे मानले जाते. ' फलाहार ' म्हणजे उपवासाच्या काळात केवळ फळांचा आहार घेणे. दिवाळीच्या काळात अनेक धार्मिक विधी आणि उपवास केले जातात. यातूनच ' फलाहार ' ही संकल्पना ' फराळ ' या शब्दात उतरली असावी. कालांतराने फराळाचा अर्थ विस्तारला आणि त्यात गोड-तिखट पदार्थांचा समावेश झाला.

**ऋतुमानानुसार आहार**

दिवाळी हिवाळ्याच्या सुरूवातीला येते. जेव्हा वातावरणात बदल होतो आणि थंडी वाढते. फराळाचे पदार्थ शरीराला ऊर्जा आणि उष्णता देणारे असतात. उदा.- लाडू आणि शंकरपाळे बनविण्यासाठी तूप, तर चकली आणि चिवड्यासाठी तेल वापरले जाते. हे पदार्थ थंडीच्या हंगामात शरीराला आवश्यक ऊर्जा पुरवितात.

**पचनास सोपे आणि आरोग्यदायी**

फराळाचे पदार्थ पचायला हलके आणि आरोग्यासाठी पूरक असतात. हे पदार्थ पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात. शरीराला हिवाळ्यासाठी तयार करतात. त्यामुळे दिवाळीच्या काळात हे पदार्थ खाण्याची प्रथा रूढ आहे.

**पाहुण्यांसाठी सोयीचे**

दिवाळीत नातेवाईक आणि मित्रमंडळी एकमेकांच्या घरी भेटी देतात. रोज नवीन पदार्थ बनविण्याऐवजी आधीच तयार केलेला फराळ पाहुण्यांना देणे सोयीचे ठरते. यामुळे वेळेची बचत होऊन उत्सवाचा आनंद घेण्यासाठी अधिक वेळ मिळतो.

**दीर्घकाळ टिकणारे पदार्थ**

फराळाचे पदार्थ साधारणपणे महिनाभर किंवा त्याहून अधिक काळ टिकतात. त्यामुळे ते दिवाळीच्या आधी मोठ्या प्रमाणात बनवून ठेवले जातात. यामुळे सणाच्या काळात स्वयंपाकाचा ताण कमी होतो.

**चवींचा संगम**

फराळात केवळ गोड पदार्थच नव्हे, तर गोड (लाडू, शंकरपाळे, करंजी) आणि तिखट-खमंग (चकली, चिवडा, शेव) अशा दोन्ही प्रकारच्या चवींचा समावेश असतो. हा चवींचा संगम फराळाला खास बनवितो आणि सर्वांच्या आवडीला साजेसा ठरतो.

**संयम आणि मेहनतीचे प्रतीक**

फराळ बनविणे ही एक कला आहे. ज्यासाठी संयम आणि कौशल्य लागते. चकलीची भाजणी, लाडू वळणे, शंकरपाळी तळणे यांसारख्या प्रत्येक प्रक्रियेत मेहनत आणि कसब दिसते. त्यामुळे फराळ हे परिश्रम आणि समर्पणाचे प्रतीक आहे.

**महाराष्ट्रीय संस्कृतीचा अविभाज्य भाग**

फराळ ही संकल्पना विशेषतः महाराष्ट्रीय खाद्यसंस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे. महाराष्ट्रात दिवाळी म्हटले, की घरोघरी फराळ बनविला जातो. तो एकमेकांना वाटला जातो. ज्यामुळे सणाचा आनंद द्विगुणित होतो.





## जमिनीची नोंद करण्यासाठी घेतली ४० हजारांची लाच

### करकंबच्या मंडलाधिकाऱ्यास अटक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तलाठ्यांनी लावलेली जमिनीची नोंद फेटाळत ऑनलाइन नोंद करण्यासाठी ४० हजारांची लाच मागितली. या प्रकरणात करकंबचा मंडलाधिकारी राजेंद्र भगवान वाघमारे (वय 53, रा. भाळवणी, ता. पंढरपूर) यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पुणे पथकाने मुद्देमालासह पकडले आहे. गुरुवार ता. ९ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेचारला पंढरपूर तहसील कार्यालयामागील रायगड भवनाजवळ ही कारवाई झाली.

**घटनेतला किस्सा**

तक्रारदार शेतकऱ्याने जमीन खरेदी केली होती. तलाठ्याने नियमानुसार नोंद लावली आणि मंजुरीसाठी मंडलाधिकाऱ्यांकडे पाठविली. मात्र मंडलाधिकारी वाघमारे यांनी ही नोंद फेटाळली. ऑनलाइन नोंद करण्यासाठी सुरूवातीला ५० हजारांची लाच मागितली. तडजोडीअंती ४० हजार रुपयांवर सहमती झाली. शेतकऱ्याने ही बाब लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली. विभागाने तक्रारीची शहानिशा करून सापळा रचला. मंडलाधिकाऱ्याने लाचेची रक्कम स्वीकारण्यासाठी तक्रारदाराला पंढरपूर तहसील कार्यालयामागील रायगड भवनाजवळ बोलावले. तेथे पैसे देताना त्यांना विभागाच्या अधिकाऱ्यांचा अंदाज आला. त्यावेळी वाघमारे यांनी रक्कम तेथेच टाकून पळण्याचा प्रयत्न केला. मात्र अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतले.

**कारवाई आणि गुन्हा दाखल**

ही कारवाई विभागाचे पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलिस अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रवीण निंबाळकर, सुहास हट्टेकर आणि रवींद्र लांभाते यांच्या नेतृत्वातील पथकाने केली. कारवाईनंतर मंडलाधिकाऱ्याच्या भाळवणी येथील घरी झाडी घेण्यात आली. वाघमारे यांच्याविरुद्ध पंढरपूर शहर पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून, रात्री उशिरा त्यांना अटक करण्यात आली. १० ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांना पंढरपूर न्यायालयात हजर केले जाईल.

**मंडलाधिकाऱ्याची भूमिका**

मंडलाधिकारी म्हणून वाघमारे यांची जबाबदारी जमिनीच्या नोंदींची मंजुरी आणि ऑनलाइन प्रक्रिया यांची आहे. मात्र या प्रकरणात त्यांनी भ्रष्टाचाराचा मार्ग अवलंबला. ही घटना शासकीय कामकाजातील पारदर्शकतेच्या महत्त्वावर प्रकाश टाकत. लाचलुचपतविरोधी मोहिमेला चालना देईल.

फ्रेश पॉईंट
चहा | कॉपी | ग्रीन टी | दूध
थंड पेय | ब्लॅक टी | लेमन टी
तुमचं मूड करा फ्रेश...!
पत्ता : ट्रक टर्मिनस शॉपी, बाजार समिती समोरील दत्त मंदिर समोर, धुळे रोड, अमळनेर

तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
' चमकण्याची ' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# जीवन से खत्म नहीं हो रही हैं परेशानियां, तो याद रखें प्रेमानंद महाराजजी की यह १० बातें

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जीवन की बड़ी से बड़ी परेशानियों को भक्ति के जरिए खत्म किया जा सकता है। प्रेमानंद महाराजजी की यह बातें व्यक्ति को सफल भी बना सकती हैं।

१) आलसी और प्रमादी को परिणाम में असफलता ही प्राप्त होती है। प्रेमानंद महाराजजी के १० अनमोल वचन, जो बदल सकते हैं जिंदगी।
२) पाप करने वाले को सुख प्राप्त नहीं होता।
३) परिवार के एक सदस्य के भजन का प्रभाव पूरे परिवार पर पड़ता है।
४) पाप कर्मों का फल ही नकारात्मक विचारों के रूप में आता है।
५) जिस स्थिति में भगवान रखें, उसी में संतुष्ट रहना चाहि
६) हर जपा गया नाम आपको भगवान के समीप ले जाता है।
७) आपका अपमान करने वाला आपके पाप नष्ट कर रहा है, बस सहन करना सीख लें।
८) जो दूसरों के दुख में आनंदित होता है, उसे महा दुख भोगना पड़ता है।
९) वृद्धजनों और माता-पिता की सेवा साक्षात् भगवान की सेवा है।
१०) किसी भी वस्तु, व्यक्ति, स्थान या विषय का आश्रय लेने का परिणाम क्लेश ही होगा।



## ९ बातें जो बच्चे को बनाएंगी आज्ञाकारी

माता-पिता प्रेमानंद महाराजजी को आज के समय में हर कोई सुनता है। लोगों का कहना है कि जो लोग प्रेमानंद महाराजजी को सुनते हैं, उन्हें जीवन में बहुत कुछ सिखने को मिलता है। ऐसी ही एक वीडियो सोशल मीडिया पर वायरल हो रही है, जिसमें प्रेमानंद महाराजजी ने बताया है कि कैसे बच्चों को अच्छी आदत सीखाकर गलत रास्ते पर जाने से रोका जा सकता है।

आजकल छोटे से छोटे बच्चों को भी मोबाइल फ़ोन की बहुत गन्दी आदत लगी हुई है। जब भी बच्चे खाना भी खाते हैं, तो उन्हें मोबाइल फ़ोन देखना होता है। प्रेमानंद महाराजजी ने इसी को देखते हुए, एक वीडियो बनाई है। जिसमें उन्होंने बताया है कि किस तरह माता-पिता अपने बच्चे को गलत रास्ते पर जाने से रोक सकते हैं।

प्रेमानंद महाराजजी बताते हैं कि जब बच्चे छोटे होते हैं, तो वो एक मिट्टी की तरह होते हैं। उस अवस्था में उन्हें किसी भी तरह की आदत में ढाला जा सकता है। महाराजजी बताते हैं कि १ से १० साल की उम्र ऐसी होती है, जिसमें बच्चे को अच्छी या बुरी आदतें सिखने में ज्यादा समय नहीं लगता है।

बच्चे जो भी देखते हैं, वो वही सीखते हैं ऐसे बहुत से पेरेंट्स हैं, जो अपने बच्चे के जीवन को लेकर काफी चिंता में रहते हैं कि कहीं हमारा बच्चा किसी गलत रास्ते पर न चला जाए। उन्हें इस बात की चिंता भी होती है कि बच्चों को क्या सिखाना चाहिए और क्या नहीं, पेरेंट्स की चिंता को दूर करने के लिए प्रेमानंद महाराजजी ने एक वीडियो बनाई है।

जिसमें उन्होंने ऐसी कुछ बातें बताई हैं, जो आप अपने बच्चे को सिखा सकते हैं। इस वीडियो में प्रेमानंद महाराजजी ने बताया है कि बच्चों की दिनचर्या कैसी होनी चाहिए और माता-पिता को अपने बच्चों को किस तरह की अच्छी आदतों को सिखाना चाहिए।

## प्रेमानंद महाराजजी ने बच्चों के लिए बताई अच्छी आदतें

१) माता-पिता को अपने बच्चों को ये सिखाना बहुत जरूरी है कि हमेशा बड़े बुजुर्गों का सम्मान करना चाहिए। उन्हें हर इंसान के प्रति आदर की भावना रखना चाहिए, जिससे वो एक महान व्यक्ति बन सकता है।
२) अपने बच्चों को टाइम मैनेजमेंट जरूरी सिखाना चाहिए, ताकि वो अपने समय को व्यर्थ न जानें दें। बचपन से ही अपने बच्चे को समझाएं कि हर काम का एक समय होता है। इससे वो कभी भी आलस्य नहीं करेगा।
३) अपने बच्चे को हमेशा चीजें बांटना सिखाइए, ताकि वो लोगों की मदद कर सके। बच्चे के लिए अकेले खाना या अपने पास ही सब रखना ठीक नहीं है। जरूरतमंदों के साथ चीजें बांटना ही सच्ची इंसानियत है। इससे आपका बच्चा स्वार्थी नहीं बनेगा।
४) उसे इस बात को भी बताना चाहिए कि कभी भी हार से हारना नहीं बल्कि इससे सीखना चाहिए। अगर खेल में हार गए या फिर परीक्षा में फेल हो गए तो घबराना नहीं है, बल्कि मेहनत और लगन से दोबारा प्रयास करना चाहिए।
५) रोज किताबों से दोस्ती करना, नई बातें सीखना और सवाल पूछना! ये सब आदतें अगर शुरुआत से डाल दी जाएं, तो बच्चा जीवनभर ज्ञान की रोशनी में आगे बढ़ेगा।
६) जितना हो सके अपने बच्चों को गलत आदतों और मोबाइल फ़ोन से दूर रखना चाहिए, ताकि वो गलत आदत से दूर रहे।

प्रेमानंद महाराजजी ने बताया कि जो बच्चें स्कूल जाते हैं, उनकी दिनचर्या कैसी होनी चाहिए। इसे लेकर प्रेमानंद महाराजजी ने बताया कि सुबह उठने का एक नियम होना चाहिए। बचपन से ही माता-पिता के साथ बच्चों को भी सूर्योदय से एक घंटे पहले उठना चाहिए। बच्चों को सबसे पहला काम पृथ्वी को प्रणाम करना चाहिए। इसके बाद पांच मिनट बैठकर पांच संतों के नाम बच्चों को लेने चाहिए। उठने के बाद माता-पिता को प्रणाम करना चाहिए। इसके बाद आधा लीटर पानी हल्का गर्म करके पीना चाहिए, फिर शौच के लिए जाना चाहिए। रोजाना थोड़ी देर प्राणायाम और व्यायाम करना बहुत ज़रूरी है। ये सब करने के बाद आप मन लगाकर पढ़ाई कर सकते हैं।

## १० अनमोल वचन, जो बदल सकते हैं जिंदगी

प्रेमानंद महाराजजी लोगों को भक्ति के मार्ग पर जीवन जीने की सीख देते हैं। उनके ये अनमोल वजन जीवन पर गहरा प्रभाव छोड़ते हैं और सही राहत दिखाते हैं।

१) लोग कटु व्यवहार करें, तब भी आपको सबसे विनम्रता से व्यवहार करना चाहिए।
२) नाम जप करते हुए अपने दैनिक कर्म करना सबसे बड़ी साधना है।
३) हमारे आचरण ही हमें भयभीत करते हैं।
४) आज का दिन तभी सार्थक है जब दूसरों का मंगल और हित किया जाए। प्रेमानंद महाराजजी ने बताया ऐसे लोगों के जीवन में कभी नहीं आता सुख, भक्ति नहीं आती है काम।
५) सबसे बड़ी पूजा अपने कर्तव्यों का पालन करना है।
६) केवल भगवान का आश्रय ही दुख और पीड़ा में मन को स्थिर रख सकता है।
७) अपवित्र आचरण करने वाला कभी भी अपने मन पर शासन नहीं कर सकता। नदी में पैसा फेंकना सही या गलत? प्रेमानंद महाराजजी ने बताया इसके बदले क्या करें
८) जो भूत-भविष्य की चिंता में रहता है, वह अपना अनमोल वर्तमान खराब करता है।
९) पूर्व का पाप ही असफलता के रूप में सामने आता है।
१०) क्षमा करने वाला महान होता है, क्रोध करने वाला नहीं। प्रेमानंद महाराजजी के अनुसार बच्चों की दिनचर्या कैसी होनी चाहिए? ये ९ आदतें बनाती हैं महान।

## कालाष्टमी व्रताची कथा, पूजेची पद्धत, नैवेद्य आणि मंत्र जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कालाष्टमीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आहे. हा दिवस भगवान शिव यांचे उग्र रूप भगवान काल भैरव यांना समर्पित आहे. प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षातील अष्टमी तिथीला कालाष्टमी व्रत केले जाते. या दिवशी व्रत करून कालभैरव यांची उपासना केल्याने जीवनातील सर्व दुःख दूर होतात. भगवंताचा आशीर्वाद प्राप्त होतो, असे मानले जाते आणि ती धारणा आहे.

**कालाष्टमी पूजा विधी :**

कालाष्टमीच्या दिवशी कालभैरवाची यथासांग पूजा करावी. पहाटे लवकर उठा, अंघोळ करा आणि स्वच्छ कपडे घाला. भगवान कालभैरव यांची मूर्ती किंवा चित्र पीठावर स्थापित करा. देवाला धूप, दिवा, फुले, नैवेद्य, पंचामृत इत्यादी अर्पण करा. कालाष्टमीची व्रत कथा ऐका. दिवसभर उपवास ठेवा आणि कालभैरव यांचे ध्यान करा. सायंकाळी चंद्र पाहून उपवास सोडावा. पारणेसाठी फळे, मिठाई आणि इतर सात्त्विक पदार्थांचे सेवन करावे.या दिवशी दान करण्याचेही विशेष महत्त्व आहे.

**पूजन आणि व्रताचे नियम :**

या दिवशी भगवान कालभैरव यांची घरी पूजा करता येते. परंतु शक्य असल्यास शिव मंदिरात जाऊन पूजा करणे अधिक फलदायी मानले जाते. देवांना दूध आणि भाकरी अर्पण केल्याने अपार पुण्य प्राप्त होते. रात्री जागरण करणे शुभ मानले जाते. या दिवशी मांस, मद्य, कांदा-लसूण असे मांसाहार करू नये.

**कालभैरव पूजा मंत्र :**

ॐ भैरवाय नमः
ॐ कालभैरवाय नमः
ॐ ह्रीं बटुक भैरवाय नमः
ॐ भ्रं कालभैरवाय फट

**कालाष्टमीचे महत्त्व :**

कालाष्टमीच्या दिवशी कालभैरव यांची पूजा केल्याने नकारात्मक शक्ती नष्ट होतात. या दिवशी केलेल्या उपासनेमुळे भय, रोग आणि शत्रूपासून मुक्ती मिळते. जो व्रत भक्तिभावाने पाळतो त्याला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यश मिळते. त्यामुळे ज्याला जीवनातील संकटांपासून मुक्ती मिळवायची असेल त्याने कालाष्टमीचे व्रत आणि पूजा करावी.

## आर्मी स्कूलच्या ४०० विद्यार्थ्यांनी घेतला दंत शिबिराचा लाभ

### रोटरी क्लब, एसीपीएम डेंटल कॉलेजचा उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विजयनाना पाटील आर्मी स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये रोटरी क्लब व एसीपीएम डेंटल कॉलेज (धुळे) यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांची दंत तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा ४०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. आर्मी स्कूलचे प्राचार्य बी. डी. पाटील अध्यक्षस्थानी होते. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डी. बी. पाटील, प्रा. शाम पवार, आयटीआयचे प्राचार्य किरण बाविस्कर, बी. एड. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. पी. चौधरी, रोटरी क्लबचे अध्यक्ष देवेंद्र कोठारी, रोटरीचे ज्येष्ठ सदस्य अभिजित भांडारकर, रोनक संकलेचा, पुष्पक कोचर, रोहित सिंघवी, दंत महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ. वर्धमान जैन, डॉ. ऐश्वर्या गायकवाड, डॉ. स्मितल बडगुजर, डॉ. वैष्णवी बनकर, डॉ. दिशा बोकडे, डॉ. श्रुती चालसे, डॉ. धनश्री चौधरी, डॉ. नंदिनी बुरांडे आदी उपस्थित होते.

माजी मंत्री पाटील म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या युगात तपासणी शिबिर घेणे काळाची गरज आहे. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आरोग्याच्या टिप्स मिळतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. डॉ. वर्धमान जैन यांनी दात कसे स्वच्छ करावेत याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना करून दाखवले. अभिजीत भांडारकर यांनी रोटरी क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवले जातील असे सांगितले. त्यानंतर सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली. शिबिराचे समन्वयक उमेश काटे यांनी सूत्रसंचालन केले. सह समन्वयक शरद पाटील यांनी आभार मानले. सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले.




## निवृत्त कामगार, कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त आगाऊ रक्कम द्यावी

### अमळनेरला विविध कामगार संघटनांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटना, अखिल महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघ व नगर पालिका कामगार युनियन शाखेतर्फे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आगाऊ रक्कम देण्याबाबत सोमवार, दि. १३ रोजी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की दिवाळी सण काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाजारपेठांमध्ये सणासुदीची लगबग सुरु झाली आहे. सर्वसामान्य नागरिक नवीन कपडे, फराळाची खरेदी करीत आहेत. मात्र, पैशाअभावी पालिकेतील सेवानिवृत्त कामगार, कर्मचारी व फॅमिली पेन्शनधारक यांच्यासमोर दिवाळी साजरी करण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सेवा निवृत्तीनंतर वेतन निम्मेपेक्षा कमी झाले आहे. यामुळे आर्थिक परिस्थिती तणावपूर्ण झाली आहे. याशिवाय सेवा निवृत्ती वेतन देखील अनेकदा वेळेवर प्राप्त होत नाही. त्यामुळे वयोवृद्ध कामगारांना व त्यांच्या कुटुबीयांना सण साजरा करणे कठीण झाले आहे.

पालिकेने राखीव निधी अथवा पालिका निधीतून प्रत्येक सेवा निवृत्त कामगार, कर्मचारी व फॅमिली पेन्शनधारकांना साडेबारा हजार रुपये दिवाळी ॲडव्हान्स स्वरूपात देण्यात यावी. ही ॲडव्हान्स रक्कम संबंधितांना दरमहा मिळणाऱ्या निवृत्ती वेतन अथवा फॅमिली पेन्शनमधून ठराविक समान हप्त्यांमध्ये कपात करून वसूल करता येईल. असे झाल्यास सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल. तेही समाजातील इतर घटकांप्रमाणे दिवाळी साजरी करू शकतील.

शासकीय व निमशासकीय कामगार, कर्मचारी यांना शासनाकडून वेतनाचे अनुदान मिळत असते. अशाच प्रकारे सेवा निवृत्त कामगार, कर्मचारी व फॅमिली पेन्शन धारकांच्या निवृत्ती वेतनासाठी शासनाकडून अनुदान निधी मिळत असतो. याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन दिलासा द्यावा, असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनाच्या प्रती आमदार अनिलदादा पाटील यांनाही देण्यात आली आहे. निवेदनावर अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस संघटनेचे सचिव रघुनाथ मोरे, संघटन मंत्री विकास जाधव, महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघाचे अध्यक्ष रुपचंद पारे, सहचिटणीस नवल बिऱ्हाडे, सरचिटणीस मुकेश बिऱ्हाडे, नगर पालिका कामगार युनियन शाखेचे अध्यक्ष विनोद जाधव, उपाध्यक्ष गुरुचरण पवार, सहसचिव सुशील बोयत यांचा समावेश आहे.

